नियमीत फौज. खटला क्र. ९४/२०१७ मधील निशाणी २३१ वरील आदेश

(CNR No.MHRT030009442017)

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.१४ सौ. माधवी सुरेंद्रनाथ माने हिने प्रस्तुत खटला प्रलंबित असताना पारपत्र काढण्यासाठी ना हरकत (N.O.C.) परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. आरोपीचे कथन असे आहे की, प्रस्तुतचा खटला आरोपींचे विरुद्ध भा.दं.वि.क. ४२० सह ३४ कलमांन्वये दाखल करण्यात आलेला आहे. ती कमलाश्रम, जाकीमिऱ्या, रत्नागिरी येथे तिचे पती सुरेंद्रनाथ यशवंत माने (माजी महाराष्ट्र विधानसभा सदस्य), दोन मुलगे मिहिर व विराज यांचेसह रहात आहे. ती एम.एस.एम. रिॲलिटी, एम.एस.एम. इन्फ्रास्ट्रक्चर या कंन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये दोन्ही मुलांसह पार्टनर असून व्हॅटेक्स प्रा. लि. फुड प्रोडक्ट व्होलसेलर डिस्ट्रीब्युटर्स कंपनीची डायरेक्टर आहे. त्यांच्या व्यावसायीक कामासाठी त्यांना परदेशात जावे लागते. त्याचप्रमाणे त्यांना मायग्रेन, डायबिटीस असल्यामुळे आरोग्याच्या होणाऱ्या निरनिराळ्या तपासण्या व औषधोपचारांसाठी परदेशात जावे लागते. त्यासाठी तिला पासपोर्टची आवश्यकता व गरज आहे. तसे न झाल्यास आरोपी ज्या कंपनीची पार्टनर व डायरेक्टर आहे त्या कंपनीचे व्यावसायकीकदृष्ट्या आर्थिक नुकसान होणार आहे. वरील कारणांसाठी आरोपी क्र.१४ हिने पासपोर्ट क्र.N5613922 हा दि.२१/१२/२०१५ रोजी काढला होता. दि.२०/१२/२०१५ रोजी त्याची वैधता संपुष्टात आली आहे. त्यामुळे आरोपीने तिला नव्याने पासपोर्ट मिळण्याकरीता पासपोर्ट ॲथोरिटी यांच्याकडे दि. १५/१२/२०२५ रोजी ऑनलाईन अर्ज केलेला आहे. त्याचे पोलीस व्हेरिफिकेशन व न्यायालयातील केस विचारात घेता पासपोर्ट काढताना न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. आरोपीला फक्त तिच्या बिझनेस ट्रॅन्झॅक्शनसाठी कमी कालावधीकरीता म्हणजे ४/५ दिवस दोन-चार महिन्यातून परदेशात जावे लागते. प्रस्तुत केसचे एकंदरीत स्वरुप विचारात घेता तिच्या ओळखीबाबत कोणताही प्रश्न निर्माण होणारा नाही. आरोपी ही थोड्या कालावधीसाठी परदेशात व्यवसायाच्या कामासाठी जावून येणार असल्यामुळे या केसच्या कामामध्ये

कोणताही तऱ्हेचा व्यत्यय येणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची तिने विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जाला सुविद्य सरकारी वकीलांनी आक्षेप घेताना कथन केले की, अर्जातील कथने खोटी व खोडसाळ असून अभियोग पक्षास मान्य व कबूल नाहीत. अर्जातील परिच्छेद क्र.२ मधील कथनांकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. अर्ज मंजूर करायचा झाल्यास न्यायालयाच्या पुर्व परवानगी शिवाय परदेशात न जाण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे त्यांनी कथन केले.

४. सरकारतर्फे सुविद्य सरकारी वकील श्री. पी.ए.सावंत व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए.एन.शेट्ये यांचा युक्तीवाद ऐकला.

५. आरोपीतर्फे सुविद्य वकील श्री. ए.एन.शेट्ये यांनी असे म्हटले आहे की, आरोपी विरुद्ध प्रलंबित खटल्याचा कालावधी अनिश्चीत अशा स्वरुपाचा आहे. खटल्याच्या सुनावणीस अद्याप प्रारंभ झालेला नाही. अशा परिस्थीतीत, खटल्याच्या सुनावणीचा कालावधी निश्चीत करता येणार नाही. त्यामुळे मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७०(इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशनप्रमाणे फौजदारी खटला प्रलंबित असताना पारपत्र नुतनीकरण करता येवू शकते अगर पारपत्र प्राप्त करण्यासाठी न्यायालय परवानगी देवू शकते. त्याचप्रमाणे खटला प्रलंबित असताना पारपत्र नुतनीकरण, परदेश गमनाची संधी अशा प्रकारच्या सवलती योग्य त्या अटी शर्तींवर आरोपीला प्रदान करता येवू शकतात. या युक्तीवादाच्या पृष्ठयर्थ त्यांनी ***आशुतोष पटनायक वि. स्टेट ऑफ ओरिसा, रिट पिटीशन क्र. ४८३४/२०२२,*** मे. ओरिसा उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयाचा दाखला दिला.

६. या विरुद्ध युक्तीवाद करताना सुविद्य सरकारी वकील श्री. पी.ए.सावंत यांनी असे स्पष्ट केले की, खटल्याची सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. अशा परिस्थीतीत, जर आरोपीस परदेश गमनाची संधी दिल्यास खटल्याला आणखी काही

कालावधी जावून दिरंगाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, आरोपी परदेशात पळून जाण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

७. मी अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपी क्र.१४ ही कमलाश्रम, जाकीमिऱ्या, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी येथील रहिवासी आहे. जर आरोपीला परदेशामध्ये जाणे अशक्य बनले तर आरोपीस व्यावसायीक अडचणीला सामोरे जावे लागणार आहे. आरोपी क्र.१४ ही जाकीमिऱ्या, रत्नागिरी येथील स्थानिक रहिवासी आहे ही बाब अभियोग पक्षाने नाकारली नाही. तिचे कुटूंब तेथे वास्तव्यास आहे. अशा परिस्थीतीत, पारपत्र काढण्यासाठी नाहरकत (N.O.C.) परवानगी दिल्यास खटल्याची सुनावणी प्रलंबित राहिल हा अभियोग पक्षाचा युक्तीवाद स्वीकारार्ह रहात नाही.

८. आरोपीचा कायमस्वरुपी पत्ता कमलाश्रम, जाकीमिऱ्या, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी असा असल्याचे दिसून येते. तिचे कुटूंबिय त्या ठिकाणी रहातात. त्यामुळे कुटूंबाला सोडून, स्थावर मिळकत सोडून आरोपी क्र.१४ ही कायमस्वरुपी परदेशी निघून जाईल ही शक्यता देखील गृहित धरता येत नाही. ती व्यावसायीक व वैद्यकीय कारणाकरीता तात्पुरत्या स्वरुपात परदेश गमन करेल असे अर्जातील कथनांवरुन निष्कर्षीत करता येते.

९. प्रस्तुतच्या खटल्याच्याकामी देखील आरोपीने तिची हजेरी स्वतःमार्फत अगर वकीलांमार्फत वेळोवेळी लावलेली आहे. प्रस्तुतच्या खटल्याची सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. प्रस्तुतच्या खटल्याची सुनावणी व त्याच्या निर्गतीसाठी लागणारा कार्यकाल निश्चीत करता येण्याजोगा नाही. पर्यायाने, जर पारपत्र काढण्यास नाहरकत (N.O.C.) परवानगी दिली तर आरोपी नं.१४ ही प्राप्त पारपत्राद्वारे परदेश गमन करेल व परदेश गमनाद्वारे आरोपीची खटल्यास असलेली गैरहजेरी खटल्याच्या दैनंदिन प्रगतीस कोणताही अडथळा ठरेल या निष्कर्षाप्रत जाता येत नाही.

१०. पासपोर्ट अधिनियम, १९६७ कलम ६(फ) ची तरतुद व मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७० (इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशन पाहता, आरोपीस योग्य त्या अटी शर्तींवर अर्ज मंजूर केल्यास खटल्याच्या सुनावणीसदेखील कोणताही अडथळा निर्माण होणार नाही असे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, न्यायाचे कारणास्तव मी खालील आदेश पारित करतो –

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र.१४ सौ. माधवी सुरेंद्रनाथ माने हिला पारपत्र काढण्याकरीता खालील अटी व शर्तींवर परवानगी देण्यात येते –

अ. मिनीस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स केंद्र शासन यांनी नोटीफिकेशन नं.जीएसआर५७० (इ) दि. २५/०८/१९९३ चे नोटीफिकेशन व पासपोर्ट अधिनियम, १९६७ कलम ६(फ) अन्वये आरोपीस एक वर्षाच्या मुदतीकरीता परेदश प्रवासासाठी/वास्तव्याकरीता पारपत्र जारी करण्यात यावे.

ब. आरोपीने परदेश गमनापुर्वी ती भविष्यात जात असलेल्या देशासंबंधी व त्याच्या सहलीच्या ठिकाणाची अगर त्या विषयाची आवश्यक ती माहिती परेदशी जाण्यापूर्वीच न्यायालयात सादर करणे त्यास बंधनकारक राहिल.

क. जर आरोपी परदेशी गेली तर भारतात परत आल्यानंतर, न्यायालयासमोर एक महिन्याच्या आत स्वतःहून हजर राहिल, अशी लेखी ग्वाही प्रतिज्ञा पत्रावर परदेशी जाण्यापूर्वी तिने पासपोर्ट ॲथोरिटीकडे व न्यायालयाकडे देणे बंधनकारक राहिल.

ड. आरोपी भारतात परत आल्यानंतर, न्यायालयात खटल्याचे कामी हजर राहिल याकरीता तिने रु.५०,०००/– चे हमीपत्र (Indemnity Bond) ती परदेशी जाण्यापूर्वी न्यायालयात सादर करावयाचे आहे.

इ. आरोपीच्या गैरहजेरीत तिचे विधीज्ञ खटल्याच्या कामाकाजाकरीता हजर राहतील आणि तिचे गैरहजेरीत तिची ओळख आव्हानीत न करता खटल्याचे कामकाज नियमतीपणे चालवतील याची तिने लेखी हमी प्रतिज्ञापत्राद्वारे (Undertaking Affidavit) परदेशी जाण्यापूर्वी द्यावी.

ई. या अटी व शर्तींचा भंग झाल्यास आरोपीस दिलेली पारपत्राची परवानगी रद्द होईल याची आरोपीने नोंद घ्यावी.

फ. आरोपी क्र.१४ हिने न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय देश सोडू नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.03.13 17:10:33 +0530

दि. १३/०३/२०२६

(श्रीम.एस.एस.पिंगळे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane, Stenographer Grade II |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 13/03/2026 |
| Judgment signed by PO. on | :- | 13/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 13/03/2026 |